भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-१७/१०/२०१८

# प्रेसनोट

## चोरीचे गुन्हयामध्ये दहा वर्षापासून पाहीजे असलेले आरोपी अटकेत

भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

दि.१६/१०/२०१८ रोजी तपास पथकाचे पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड हे तपास पथकाचे स्टाफसह पो.ठाणेस डयुटीस हजर असताना भारती विदयापीठ पोलीस ठाणे गु.र.नं ३७/२००८, भा.द.वि.कलम ३७९ मधील निष्पन्न व पाहीजे आरोपी नामे १).वैभव वसंत साटम रा.रायकरनगर वडगाव धायरी पुणे २).रविंद्र पांडुरंग सावंत रा.कचरे गल्ली इस्लामपूर जि.सांगली हे त्यांचे राहते घरी असल्याबाबतची माहीती बातमीदारामार्फत **सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव व पोलीस नाईक प्रणव सकपाळ** यांना प्राप्त झाल्याने वरिष्ठांचे परवानगीने स्टाफसह दिले पत्यावर जावुन शोध घेतला असता ते राहते घरी मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेवुन पोलीस ठाणे येथे आणुन त्यांचेकडे दाखल गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता त्यांनी दाखल गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे.

सदरचे आरोपी हे सन २००८ पासून गेले दहा वर्षापासून मिळून येत नव्हते अधिक तपास तपास पथकाचे पो.उप-निरीक्षक शिवदास गायकवाड हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम विभाग, मा.श्री बच्चन सिंह सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.रविद्र रसाळ सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, विष्णू पवार वरिष्ट पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री. शिवदास गायकवाड, सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव, पोलीस हवालदार विनोद भंडलकर,गणेश सुतार,प्रणव सकपाळ,उज्वल मोकाशी, शिवदत्त गायकवाड यांचे पथकाने केलेली आहे.**